**तृतीय वर्ष कला ( T.Y.B.A )**

**मराठी ( विशेषस्तर पेपर —४ )**

**भाषाविज्ञान — $S_4$**

पुनर्रचित अभ्यासक्रम आराखडा

सन २०१५—२०१६ पासून

# भाषाविज्ञान— वर्णनात्मक आणि ऐतिहासिक

---

❖ **अभ्यासक्रमाची उद्दिष्टये:—**

१) भाषेचे स्वरूप व कार्य, भाषेच्या अभ्यासाचे महत्त्व, भाषेच्या अभ्यासाची प्रमुख अंगे जाणून घेणे.

२) भाषा म्हणजे काय व तिचे मानवी जीवनातील कार्य व महत्त्व जाणून घेणे.

३) वेगवेगळ्या भाषाअभ्यासपद्धतींचे वेगळेपण व महत्त्व जाणून घेणे.

४) स्वननिर्मितीची प्रक्रिया समजावून घेणे.

५) वागिंद्रियांची रचना व कार्ये समजावून घेणे.

६) स्वनविज्ञान, स्वनिम संकल्पना आणि मराठीची स्वनिम व्यवस्था जाणून घेणे.

७) मराठीची रूपिमव्यवस्था समजावून घेणे.

८) वाक्यविन्यास व अर्थविन्यास या भाषावैज्ञानिक संकल्पनांचा मराठीच्या संदर्भात स्थूल परिचय.

९) ऐतिहासिक भाषाभ्यासपद्धतीचे स्वरूप व महत्त्व लक्षात घेणे.

१०) भाषाकुलाची संकल्पना जाणून घेवून मराठी भाषेच्या उत्पत्तीचा अभ्यास करणे.

११) मराठी भाषेचा उत्पत्तीकाळ जाणून घेवून तत्कालीन भाषिक स्थित्यंतरांचा आढावा घेणे.

१२) टप्प्याटप्प्याने भाषा म्हणून मराठीच्या वाटचालीचा ऐतिहासिक आढावा घेणे.

---

# प्रथम सत्र

**एकूण तासिका— ४८**

१. **भाषेचे स्वरूप व कार्य :—**भाषा एक सहज क्रिया — भाषा : एक अर्जित वस्तू — संज्ञापन : भाषेचे मुख्य कार्य — संकेत : भाषेचा आधार — शारीरिक आणि मानसिक क्रियांचा संयोग — ध्वनिसंकेत : चिन्ह आणि चिन्हित — संज्ञापनाची अन्य साधने: शरीरस्थित — संज्ञापनाची साधने: शरीरबाहय — भाषा हे सर्वश्रेष्ठ संज्ञापन साधन — संज्ञापनातील क्रिया प्रतिक्रिया — मानवेतर प्राण्यांची भाषा — भाषा : एक सामाजिक संस्था — भाषा आणि व्यक्तिस्वातंत्र्य — भाषेच्या अभ्यासाची आवश्यकता. भाषाअभ्यासाची अंगे, भाषाभ्यास पद्धती **—**वर्णनात्मक भाषाभ्यासपद्धती, **ऐतिहासिक** भाषाभ्यासपद्धती, तौलनिक भाषाभ्यासपद्धती, समाजभाषाभ्यासपद्धती.

२. **स्वनविज्ञान आणि स्वननिर्मिती :—** वागिंद्रियाची रचना व कार्ये
स्वनविज्ञानाचे स्वरूप—स्वन निर्माण करणारी इंद्रिये—जिभेचे महत्त्व—स्वननिर्मितीची प्रक्रिया—मुखमार्ग, नासिकामार्ग आणि पडजीभ— दात आणि ओठ यांचे कार्य—तालुपटाची रचना व कार्य—स्वरांचे स्वरूप, लक्षणे व प्रकार—व्यंजनांचे स्वरूप लक्षणे व प्रकार—स्वरांच्या वर्गीकरणाची तत्त्वे— स्वननिर्मितीमधील‘प्रयत्ना’चे स्वरूप.

३. **स्वनिम विचार :—** स्वनिम निश्चितीचे तत्त्वे, विनियोग संकल्पनेचा स्थूल परिचय, स्वन, स्वनिम व स्वनांतर यामधील परस्परसंबंध, मराठी स्वनिमव्यवस्थेची रूपरेषा, स्वरस्वनिम, अर्धस्वरस्वनिम, व्यंजनस्वनिम यांचे वर्गीकरण.

४. **रूपिम विचार :—** रूपिमचे तत्त्व, रूपिका—रूपिम आणि रूपिकांतर यांमधील परस्परसंबंध, रूपिकांचे प्रकार प्रकृति (धातू) आणि प्रत्यय यांचे वर्गीकरण (आशयबोधक रूपिम व कार्यकारी रूपिम)

———————————————————————————————————————

# <u>द्वितीय सत्र</u>

**एकूण तासिका— ४८**

५. **वाक्**यविचार — वाक्यविन्यास संकल्पना आणि मराठीतील वाक्यविन्यास व्यवस्था, वाक्याचे घटक

६. **अर्थविचार** — अर्थविन्यास व मराठीतील त्याचे स्वरूप, अर्थ ही संकल्पना, अर्थाचे विविध प्रकार

७. **ऐतिहासिक भाषाभ्यासपध्दती** — सर विल्यम जोन्स यांचा सिद्धांत — ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे स्वरूप — कार्य, **भाषाकुलाची संकल्पना** — भाषांचे वर्गीकरण — जगातील प्रमुख भाषाकुले — इंडो युरोपियन भाषाकुल — आर्य भाषाकुल व मराठी भाषा — होर्न्ले यांचा अंतर् बहिर् वर्तुळ सिध्दांत.

८. **मराठी भाषेची उत्पत्ती :—** मराठी भाषेची उत्पत्ती व त्यासंबंधीची साधने — मराठी भाषेच्या उत्पत्ती संबंधी विविध सिध्दांत — वैद्य—गुणे वाद, मराठीचे कालिक भेद

---

❖ <u>**संदर्भ साहित्य**</u>


१. भाषाविज्ञान : वर्णनात्मक व ऐतिहासिक — संपादक— मालशे, इनामदार, सोमण.

२. भाषा: इतिहास आणि भूगोल — डॉ. ना. गो कालेलकर.

३. ऐतिहासिक भाषाशास्त्र — डॉ. र. रा गोसावी

४. वर्णनात्मक भाषाविज्ञान— स्वरूप आणि पध्दती — संपादक— डॉ. काळे, डॉ. सोमण.

५. भाषा — अंत:सूत्र आणि व्यवहार— संपादक— मुं. ग पानसे.

६. भाषा व संस्कृती — डॉ. ना. गो. कालेलकर.

७. अभिनव भाषाविज्ञान — डॉ. गं. ना. जोगळेकर

८. भाषाविज्ञान परिचय — डॉ. मालशे, डॉ. सोमण, डॉ. पुंडे

९. वर्णनात्मक भाषाविज्ञान — डॉ. लीला गोविलकर

१०.भाषाशास्त्र विचार — डॉ. र. बा मंचरकर

११.मराठी भाषेचा आर्थिक संसार — अशोक केळकर

१२.मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान — डॉ. महेंद्र कदम

१३.मराठीचा भाषिक अभ्यास — संपादक मु. श्री. कानडे

१४.सुबोध भाषाशास्त्र — डॉ. प्र. न. जोशी

१५.मराठी भाषेचा इतिहास — डॉ. गं. ना जोगळेकर

१६.सुलभ भाषाविज्ञान — डॉ. द. दि. पुंडे

१७.सामाजिक भाषाविज्ञान — संपादक डॉ. जयश्री पाटणकर

१८.सामाजिक भाषाविज्ञान व बोली— डॉ. शशिकला कांबळे


---

**तृतीय वर्ष कला ( T.Y.B.A )**

**मराठी ( विशेषस्तर पेपर —४ )**

**भाषाविज्ञान — S- 4**

सन २०१५—२०१६ पासून

**प्रथम सत्र**

**प्रश्नपत्रिका स्वरूप व गुणविभागणी आराखडा**

(सन २०१५—२०१६ पासून)

**वेळ — २ तास** **एकूण गुण — ६०**

---

**प्र. १ला. खालील प्रश्नांची २० शब्दांपर्यंत उत्तरे लिहा. गुण — १४**

यामध्ये एकूण १० प्रश्न विचारावेत, पैकी कोणतेही ७ प्रश्न सोडवावेत.

**प्रश्न २रा. खालील प्रश्नांची ५० शब्दांपर्यंत उत्तरे लिहा. गुण — ०८**

यामध्ये एकूण ४ प्रश्न विचारावेत, पैकी कोणतेही २ प्रश्न सोडवावेत.

**प्रश्न ३रा. खालील प्रश्नांची १५० शब्दांपर्यंत उत्तरे लिहा. गुण — १८**

यामध्ये एकूण ४ प्रश्न विचारावेत, पैकी कोणतेही ३ प्रश्न सोडवावेत.

**प्रश्न ४ था. खालील प्रश्नांची ३०० शब्दांपर्यंत उत्तरे लिहा. गुण — २०**

यामध्ये एकूण ४ प्रश्न विचारावेत, पैकी कोणतेही २ प्रश्न सोडवावेत.

---

**तृतीय वर्ष कला ( T.Y.B.A )**

**मराठी ( विशेषस्तर पेपर —४ )**

**भाषाविज्ञान — S- 4**

**वार्षिक प्रश्नपत्रिका स्वरूप व गुणविभागणी आराखडा**

(सन २०१५—२०१६ पासून)

**वेळ — ३ तास** **गुण — ८०**

---

**प्र. १ला. खालील प्रश्नांची २० शब्दांपर्यंत उत्तरे लिहा.** **गुण — २०**

यामध्ये द्वितीय सत्रातील अभ्यासक्रमाशी संबंधित एकूण १३ प्रश्न विचारावेत, पैकी कोणतेही १० प्रश्न सोडवावेत.

**प्रश्न २रा. खालील प्रश्नांची ५० शब्दांपर्यंत उत्तरे लिहा.** **गुण — १०**

यामध्ये द्वितीय सत्रातील अभ्यासक्रमाशी संबंधित एकूण ४ प्रश्न विचारावेत, पैकी कोणतेही २ प्रश्न सोडवावेत.

**प्रश्न ३रा. खालील प्रश्नांची १५० शब्दांपर्यंत उत्तरे लिहा.** **गुण — २०**

**अ)** प्रथम सत्रातील अभ्यासक्रमाशी संबंधित २ प्रश्न विचारावेत, पैकी कोणताही १ प्रश्न सोडवावा.

ब) द्वितीय सत्रातील अभ्यासक्रमाशी संबंधित एकूण २ प्रश्न विचारावेत, पैकी कोणताही १ प्रश्न सोडवावा.

**प्रश्न ४ था. खालील प्रश्नांची ३०० शब्दांपर्यंत उत्तरे लिहा.** **गुण — ३०**

**अ)** प्रथम सत्रातील अभ्यासक्रमाशी संबंधित २ प्रश्न विचारावेत, पैकी कोणताही १ प्रश्न सोडवावा.

ब) द्वितीय सत्रातील अभ्यासक्रमाशी संबंधित एकूण २ प्रश्न विचारावेत, पैकी कोणताही १ प्रश्न सोडवावा.

---